प्रति
बाळासाहेब राक्षे
शिक्षणाधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

आदरणीय साहेब
संदर्भ: १. ठाणे महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र. 15, लक्ष्मी चिराग नगर, ठाणे - ४००६०६ ("यापुढे "शाळा" म्हणून संदर्भित ) येथे आहे.

आमचा **दिनांक १६/१२/२०२३** चा अर्ज तुम्हाला **आवक क्रमांक ४५६९/२२** दिनांक **१६/१२/२०२२** द्वारे सादर केला आहे. **१९/०५/२०२३** रोजी माननीय अतिरिक्त आयुक्तांची मान्यता (२) तुमचे निर्देश बेअरिंग **क्र. ठा.म.पा. /शिक्षण /५४०१२३ दिनांक २३/०५/२०२३**

**विषय : शाळा दत्तक कार्यक्रमाच्या द्वितीय ६ महिन्यांच्या कालावधीत आम्ही हाती घेतलेले उपक्रम व त्याची झालेली पूर्तता यांचा अहवाल तुम्हाला सादर करत आहोत.**

**उपक्रम क्र. ८ किड्स प्ले झोन बनविणे.**

शाळा दत्तक घेतल्या पासून जसे आम्ही वर नमूद केलेले सर्व उपक्रम योग्य रीतीने पार पाडत आलो त्याचा आनंद आम्हाला व शाळेतील शिक्षकांना तर होताच पण आपल्या शाळेचे गटप्रमुख सौ अनघा पालांडे मॅडम यांनाही या गोष्टीचा खूप अभिमान आहे. असेच एकदा संस्थेचे सर्व विश्वस्त आणि शाळेतील सर्व शिक्षक व गटप्रमुख सौ अनघा पालांडे मॅडम यांची शाळेसाठी आणखी काय करता येईल या साठी बैठक चालू असताना शाळेतील पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी आपण एखादा किड्स प्ले झोन बनवावा असा प्रस्ताव त्यांनी मांडला. विद्यार्थ्यांच्या हिताच्या द्रुष्टीने हा प्रस्ताव सर्वांना आवडला आणि किड्स प्ले झोन या नवीन उपक्रमाची सुरुवात झाली. पुढे किड्स प्ले झोन साठी एका मोठ्या शैक्षणिक वर्गाची निवड करण्यात आली त्याच बरोबर त्या वर्गात विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक द्रुष्ट्या तसेच मनोरंजन द्रुष्ट्या कोणती खेळणी, कोणते टेबल खुर्ची, अश्या बऱ्याच काही उपयोगी गोष्टींची यादी बनवण्यात आली (यादी सोबत जोडलेली आहे) आणि त्या अनुषंगाने या सर्व गोष्टींची पूर्तता करण्यास सुरुवात झाली.

याचप्रमाणे किड्स प्ले झोन यासाठी जो वर्ग निवडला त्या मध्ये **दिनांक ५ ऑक्टोबर २०२३** रोजी एक अतिशय उत्तम प्रतीचे पीव्हीसी फ़्लोरिंग बसवण्यात आले आणि त्या पुढे सोबत दिलेली यादी घेऊन आणि काही शिक्षक व आमच्या संस्थेच्या काही सहकाऱ्यांसोबत आम्ही मुंबईला जाउन त्या वस्तूंची खरेदी केली व **दिनांक २७ ऑक्टोबर २०२३** रोजी किड्स प्ले झोन चे उदघाटन आमच्या कंपनीचे **प्रकल्प - वरिष्ठ व्यवस्थापक श्री शरद दराडे सर** यांच्या शुभ हस्ते खूप थाटात पार पडला.























## उपक्रम क्र. ९ चित्रकलेचे वर्ग सुरु करणे.

**दिनांक १४ ऑगस्ट २०२३** रोजी घेतलेली चित्रकला स्पर्धा व त्याला मिळालेला अप्रतिम प्रतिसाद लक्षात घेता आमच्या संस्थेचे विश्वस्त श्री देबराज भांजा व शाळेचे मुखाध्यापक श्री अंकुश लांघी सर यांच्यात सल्लामसलत झाली व परिणामी सर्व विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातील प्रत्येक शनिवारी चित्रकला वर्ग घेण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. व आता प्रत्येक शनिवारी शाळेत चित्रकलेचे वर्ग भरतात व सर्व विद्यार्थ्यांचा या वर्गाला खूप उत्तम प्रतिसाद मिळत आहे. तसेच विद्यार्थ्यांना चित्रकलेचे धडे देण्यासाठी आमच्या संस्थेतील काही महिला स्वयंसेवक ज्यांनी चित्रकलेचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण घेतलेले आहे ते शाळेत येतात. आणि हा उपक्रम सुद्धा खूप उत्तमरीत्या कार्यरत आहे.








## उपक्रम क्र. १० स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग सुरु करणे.

सद्य परिस्थितीमध्ये जसे विद्यार्थी मानसिक दृष्ट्या प्रबळ असतात तसेच ते शारीरिक दृष्ट्या प्रबळ असावेत असा विचार शाळेतील शिक्षक श्री आहेर सर यांनी मांडला याला साद घालत शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थीनींसाठी जर स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग सुरु करता आले तर विद्यार्थिनींला याचा भविष्यात खूप मोठा फायदा होईल असा प्रस्ताव मांडत विनंती केली. आणि या विनंतीला मान देऊन आमच्या संस्थेचे संस्थापक विश्वस्त श्री मोकाशी सर यांनी शाळेतील सर्व विद्यार्थिनीसाठी प्रत्येक शनिवारी स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग सुरु करावेत अशी घोषणा केली तसेच ठाणे शहरातील खूप प्रसिद्ध स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग चालवणारे श्री रुपेश राठोड जे आंतरराष्ट्रीय स्तरावर असे वर्ग चालवतात यांची नियुक्ती आपल्या शाळेतील विद्यार्थीनींचे स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी केली. आणि **दिनांक १६ डिसेंबर २०२३** पासून आतापर्यंत आपल्या शाळेत हे प्रशिक्षण वर्ग अतिशय चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत.









## उपक्रम क्र. ११ पालक सभा घेणे

आपला पाल्य शाळेत काय करतो हे सर्व पालकांना माहिती असावे किंबहुना आपण शाळेत जाऊन रोज काय करतो अथवा आपल्या शाळेत शैक्षणिक व मनोरंजक दृष्ट्या काय काय बदल झालेला आहे हे पाल्याने आपल्या पालकांना वेळोवेळी सांगितले पाहिजे जेणेकरून पालकांना तसेच शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शैक्षणिक प्रगती कशी करता येईल या बाबत योग्य तो निर्णय घेता येईल. यावर उपाय म्हणून सर्व शिक्षक व आमचे विश्वस्त यांनी एकत्र येऊन एक पालक सभा आयोजित करावी असा ठराव झाला आणि **दिनांक २९ डिसेंबर २०२३** आणि **दिनांक १६ फेब्रुवारी २०२४** रोजी आपल्या शाळेत सर्व शिक्षक आणि संस्थेचे विश्वस्त यांच्या देखरेखी मध्ये एक भव्य पालक सभा पार पाडण्यात आली.










## उपक्रम क्र. १२ इंग्रजी बोलण्याचे वर्ग घेणे

जेव्हा इतर सर्व वर्ग सुरु झाले त्या वेळी असे लक्षात आले कि विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने मुलांना इंग्रजी भाषा हि योग्य प्रकारे बोलता आली पाहिजे ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला हातभार लागेल आणि आधुनिक बदलत्या शिक्षण पद्धती ज्या शक्यतो इंग्रजी भाषेत असतात त्यांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना भविष्यात अडचण येऊ नये यासाठी आमचे विश्वस्त श्री देबराज भांजा आणि गटप्रमुख सौ अनघा पालांडे मॅडम यांच्यात विचार विनिमय झाला व आपण इंग्रजी बोलण्याचे वर्ग सुद्धा घ्यावेत असा निर्णय झाला. आणि **दिनांक १६ जानेवारी २०२४** रोजी शाळेमध्ये आठवड्यातील पाच दिवस सकाळी एक तास इंग्रजी बोलण्याचे वर्ग व्यवस्थित रित्या भरू लागले.













## उपक्रम क्र १३ रक्तगट तपासणी शिबीर घेणे

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी रक्तगट तपासणी करण्यासाठी शाळेच्या अधिकाऱ्यांनी **“मै हू ना चॅरिटेबल ट्रस्टला”** विनंती केली. या मोहिमेचे आयोजन करण्यासाठी आम्ही डॉ. वर्षा यांच्याकडे संपर्क साधला, त्यानुसार **दिनांक  २४ जानेवारी २०२४** रोजी ही मोहीम आयोजित करण्यात आली आणि रक्तगट  तपासणीचे निकाल शाळेच्या अधिका-यांना सुपूर्द करण्यात आले.












